पुणे जिल्हा परिषद , पुणे
नवीन प्रशासकीय इमारत
**आरोग्य विभाग**
जा.क्र.आरोग्य/आस्था ३/13714/२०२४
पुणे, दि. 23 /02/२०२४

प्रति,

१) वैदयकीय अधिकारी,
प्रा.आ.केंद्र (सर्व)

२) तालुका आरोग्य अधिकारी,
पंचायत समिती सर्व

विषयः- प्रयोग शाळा तंत्रज्ञ या पदावरील कर्मचाऱ्यांची दि.१.१.२०२४ रोजीची तात्पुरती सेवाजेष्ठता यादी प्रसिध्द करणे बाबत.

उपरोक्त विषयान्वये प्रयोग शाळा तंत्रज्ञ या पदावरील कर्मचाऱ्यांची व दिव्यांग कर्मचाऱ्यांची **दि.१.१.२०२४** रोजीची **तात्पुरती सेवा जेष्ठता यादी** सोबत सादर करणेत येत आहे. सदरची सेवा जेष्ठता यादी सर्व संबंधित कर्मचाऱ्यांच्या निर्दशनास आणून त्यांची स्थळ प्रतीवर स्वाक्षरी घेवून सोबत जोडलेल्या विहीत "प्रपत्रात व प्रमाणपत्रासह " तात्काळ या कार्यालयास सादर करावी.

प्रयोग शाळा तंत्रज्ञ या संवर्गातील कर्मचाऱ्यांची अंतिम सेवाजेष्ठता यादी अदयावत करावयाची असल्याने सदर संवर्गातील सर्व कार्यरत कर्मचाऱ्यांची सेवा विषयक माहिती त्यांचे मुळ सेवानोंद पुस्तक, शैक्षणिक प्रमाणपत्र, मागासवर्ग असलेस जातीचे प्रमाणपत्र/वैधता प्रमाणपत्र, अपंगात्वचे प्रमाणपत्र व त्या अनुषंगिक आदेश/कागदपत्रे यावरुन खात्री करुन बिनचूक माहिती दयावी. तसेच आंतरजिल्हा बदलीने रुजू/कार्यमुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे रुजू/कार्यमुक्त आदेश, मयत कर्मचाऱ्यांचे मृत्यू दाखले व सेवानिवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्ती आदेश, पदोन्नती झाली असल्यास पदोन्नती आदेश व कार्यमुक्त आदेश यावरुन खात्री करुन बिनचूक माहिती दयावी, एखादया कर्मचाऱ्याचे नाव सदर यादीत समाविष्ट नसल्याचे निदर्शनास आल्यास सदर कर्मचाऱ्याच्या नावाचा समावेश करणेसाठी माहिती सादर करणेत यावी.

तसेच सदर सेवाजेष्ठता यादी बाबत काही हरकत, सुचना, दुरुस्ती इ.बाबी असतील तर त्या बाबतचीही माहिती सोबतच्या प्रपत्र "अ"व "ब " मध्ये दि. २९/०२/२०२४ पुर्वी कार्यालय प्रमुखांच्या स्वाक्षरीने सादर करावी. तसेच सदरची माहिती सोबत विहीत प्रमाणपत्र व उपरोक्त नमूद आदेश/कागदपत्रे खास दुतामार्फत सादर करणेची व्यवस्था करावी जेणेकरुन प्रयोग शाळा तंत्रज्ञ संवर्गाची दिनांक ०१/०१/२०२४ रोजीची अंतिम सेवा जेष्ठता यादी प्रसिध्द करणे सुलभ होईल. दिनांक २९/०**3**/२०२४ नंतर येणाऱ्या हरकती व सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत. तसेच हरकती व सूचना **दिनांक २९/०3/२०२४** पूर्वी सादर न केल्यास अंतिम सेवा जेष्ठता यादी प्रसिध्द करणेकामी होणाऱ्या विलंबास सर्वस्वी आपणांस जबाबदार धरणेत येईल.

(डॉ सचिन देसाई)
जिल्हा आरोग्य अधिकारी ,
पुणे जिल्हा परिषद, पुणे.

सोबत :- १. तात्पुरती जेष्ठता यादी २. प्रपत्र अ, ब तसेच प्रमाणपत्र

# प्रपत्र अ

दिनांक ०१/०१/२०२४ रोजीच्या तात्पुरत्या सेवा जेष्ठता यादीतील प्राप्त हरकती, सूचना व दुरुस्त्यांनूसार याच्या बदलांबाबतची माहिती.

(प्रपत्र ब मधील कर्मचाऱ्यांच्या एकत्रित माहिती)

**संवर्गाचे नांव :–** प्रयोग शाळा तंत्रज्ञ

| अ. क्रं. | जेष्ठता यादीतील क्रमांक | दुरुस्त करावयाचा तपशिल | दुरुस्तीसाठी पुराव्या दाखल कागदपत्र साक्षांकित प्रत आवश्यक | कार्यालयाने दुरुस्ती बाबत खात्री केली आहे किंवा कसे | कार्यालय प्रमुख यांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |
| | | | | | |

सही . ..................................

पदनाम . ..............................

तालुका

# प्रपत्र ब

(कर्मचाऱ्याने आक्षेपांसाठी भरुन द्यावयाची माहिती)

**संवर्गाचे नांव :–** प्रयोग शाळा तंत्रज्ञ

| अ. क्रं. | जेष्ठता यादीतील क्रंमाक | दुरुस्ती करावयाचा तपशिल | दुरुस्तीसाठी पुराव्यादाखल आवश्यक कागदपत्र साक्षांकित प्रत | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |
| | | | | |

सही . ..................................

पदनाम . ..............................

तालुका

# प्रमाणपत्र

प्रमाणपत्र देणेत येते की , या कार्यालयाकडील पत्र क्र. आरोग्य /आस्था-२/ / २३ दि. /०२ / २०२४ नूसार " प्रयोग शाळा तंत्रज्ञ " या संवर्गाची तात्पुरती सेवा जेष्ठता यादी सर्व सेवकांचे निदर्शनास आणली आहे. यादी निदर्शनास आणले बाबतची त्यांची स्वाक्षरी घेऊन दप्तरी ठेवली आहे.

सदर जेष्ठता यादीत समाविष्ट केलेली माहिती सेवा पुस्तकाशी पडताळून पाहिली आहे. त्याप्रमाणे मागासवर्गीयांबाबतची माहिती संबंधित कर्मचाऱ्यांचे जातीचे प्रमाणपत्राशी पडताळून पाहिली आहे. या बाबतच्या दुरुस्त्या प्रपत्र " **ब** " मध्ये समाविष्ट केल्या आहेत.

सदर सेवा जेष्ठतायादीतील कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या हरकतींची छानणी करुन त्या बाबतची माहिती त्यांचे मुळ निवेदनासह सोबत पाठविली आहेत. कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या हरकतींची छानणी करुन त्याबाबत माहिती त्यांचे मुळ निवेदनासह सोबत प्रपत्र "**अ** " मध्ये सादर केलेली आहे.

तसेच सदरचे सेवा जेष्ठतायादीमध्ये " प्रयोग शाळा तंत्रज्ञ "या संवर्गातील सर्व कर्मचाऱ्यांचा समावेश असलेची खात्री करणेत आलेली आहे.

सही . ..................................
पदनाम . ..............................
तालुका

## जिल्हा परिषद पुणे,आरोग्य विभाग

### प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदावरील कर्मचा-यांची दिनांक १/१/२०२४ रोजीची तात्पुरती सेवाजेष्ठता यादी

| अ.क्र | सेवाजेष्ठता क्रमांक | कर्मचा-याचे संपुर्ण नाव | कार्यालयाचे नाव | जात प्रवर्ग (नियुक्ती नंतर प्रवर्ग बदलला असल्यास त्याचा प्रवर्ग) | जन्मतारीख | सध्याच्या पदावरील रुजु दिनांक | नियुक्ती मार्ग | जेष्ठता दिनांक/जेष्ठतेचा मानिव दिनांक | सेवानिवत्ती दिनांक | शैक्षणिक अर्हता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | १ | श्री.दत्तात्रय किसन बैरागी | तळेघर/आंबेगाव | भजब | ६/१/१९६८ | १/१६/१९९७ | सरळसेवा | १/१६/१९९७ | ५/३१/२०२६ | बी.एस्सी रसायनशास्त्र | – |
| २ | २ | श्री.जगदीश अंकुश इंगळुणकर | आपटाळे/जुन्नर | अजा | १०/६/१९७० | १/१७/१९९७ | सरळसेवा | १/१७/१९९७ | १०/३१/२०२८ | बी.एस्सी रसायनशास्त्र | – |
| ३ | ३ | श्रीम.स्मिता सिताराम लोंढे | डेहणे/खेड | इमाव | ७/५/१९७३ | ३/२५/१९९७ | सरळसेवा | ३/२५/१९९७ | ७/३१/२०३१ | बी.एस्सी रसायनशास्त्र | – |
| ४ | ४ | श्री.अविनाश बबन गुरव | परिंचे/पुरंदर | इमाव | ७/१८/१९७१ | ७/२७/१९९८ | सरळसेवा | ७/२७/१९९८ | ७/३१/२०२९ | बी.एस्सी रसायनशास्त्र | – |
| ५ | ५ | श्री.निलेश भिमाजी लहांगे | डिंभा/आंबेगाव | अज | १२/२४/१९८९ | ७/९/२०१३ | सरळसेवा | ७/९/२०१३ | १२/३१/२०४७ | बी.एस्सी प्राणीशास्त्र | – |

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, पुणे.